(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

Navjyot / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

# कोरोना आणि भारतीय राजकारण

**डॉ. राहुल दत्ता मांडणीकर,** विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

........................................................................................

**प्रस्तावना :**

जगात आणि भारतात कोरोनाचे भीषण संकट आहे आणि हे संकट कोणत्या थराला जाऊन पोहचेल याविषयी कोणालाही अंदाज बांधता येणार नाही. या साथीपुढे जगातील बलशाली राष्ट्रे हतबल झालेली आपण पाहत आहोत. अगदी सुक्ष्म स्वरूपाच्या विषाणूने संपूर्ण जगाला चिंताग्रस्त करून सोडले आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारमुळे जगभरातील मानवी समुहाला फक्त आणि फक्त जीवंत राहणे हीच मूलभूत गरज बनली आहे. अशा या आपत्तीच्या काळात केंद्र-राज्य संबंधाचे नियमन करताना न्यायीक तत्त्वांचे पालन करणे गरजेचे आहे. केंद्रातील सत्ताधारी पक्षाव्यतिरिक्त अन्य पक्षाकडून चालवल्या जाणाऱ्या राज्य सरकारचे केंद्र सरकारकडून दमण होताना दिसून येत आहे. केंद्र-राज्य संबंधात पक्षीय राजकारणाचे स्वरूप निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे. अशा भीषण संकटाच्या परिस्थितीत राज्य सरकारचे मत विचारात न घेता केंद्र सरकारने निर्णय घेतलेले आहेत. काही घटकराज्याच्या सरकारने निर्णय घेतल्यावर केंद्र सरकारला जाग आल्याचे दिसून येत आहे. उदा. महाराष्ट्र सरकारने १९ मार्चला महराष्ट्रातील मुंबई-पुणे-नागपूर या शहरात लॉकडाऊन घोषित केलेला होता. त्यानंतर केंद्र सरकारला जाग आली. अशा केंद्र सरकारच्या धोरणामुळे सत्तेचा असमतोल निर्माण होऊ शकेल हे नाकारता येणार नाही. सध्याचे केंद्र सरकार लॉकडाऊन संदर्भातील निर्णय राज्य सरकारवर सोपवण्याच्या आपल्या अधिकाराचा वापर करताना दिसत आहे. यामुळे या साथीच्या रोगाचा सामना करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर येऊन पडत आहे. कोरोना रोगाचा सामना करण्याची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य सरकारची आहे. बहूधा केंद्र सरकार या जबाबदारीतून माघार घेते की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते. साथीच्या रोगाचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून भक्कम आर्थिक मदतीची गरज राज्य सरकारला आहे. परंतू केंद्र सरकार तशी मदत करताना दिसून येत नाही. केंद्र सरकार साथीच्या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी वेळ व पैसा खर्च करणे गरजेचे असताना आपली वोट बँक कशी तयार होईल याकडे लक्ष देताना दिसून येत आहे. भारतातील विविध घटकराज्यांनी लॉकडाूनच्या काळातील मजुरांना त्यांच्या गावी-घरी पोहचवण्यासाठी केंद्र सरकारकडे विनंती केली. त्यावर केंद्र सरकार राजकारण करताना दिसून आले. उत्तर प्रदेशातील मजुरांना घरी पोहोचवण्यासाठी बसेसची व्यवस्था करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाला प्रियंका गांधी यांनी कळविले होते. त्याबाबतही राजकारण झालेले दिसून येते. महाराष्ट्रातही असेच घडले आहे. केंद्र सरकारकडे रेल्वेची मागणी केली तेव्हाही केंद्र सरकारने राजकारण केलेले दिसून येते.

साहजिकच एवढ्या मोठ्या संकटाचा सामना करताना सर्व राजकीय आणि पक्षीय मतमतांतरे बाजू ठेवत राज्य सरकारद्वारे प्रयत्न होणे गरजेचे आहे. या कालावधीत केंद्र सरकारने विकेंद्रिकरणाचा दृष्टीकोण डोळ्यासमोर ठेऊन राज्य सरकार, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था यांना अधिकाधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

**१) कोरोना संकट - केंद्र-राज्य संबंध :**

देशातील प्रमुख राजकीय पक्ष किंवा राज्य सरकारे यांच्याशी विचार विनिमय न करता केंद्र सरकारने लॉकडाऊनच्या संदर्भात घेतलेला निर्णय हा केंद्र-राज्य संबंधांना छेद देणारा ठरला आहे. केंद्र सरकारच्या या लॉकडाऊनच्या घोषणेमुळे राज्यातील जनता बरीच हतबल झाली आहे. या कालावधीत ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या समस्यांचे निराकरण मात्र राज्य सरकारला करावे लागते. लॉकडाऊनच्या अचानक झालेल्या निर्णयामुळे अडकून पडलेल्या स्थलांतरीत कामगार व मजुरांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात गाजला होता. ही समस्या हाताळताना राज्य सरकारला केंद्र सरकार वेळेत मदत करताना दिसून येत नाही. यामुळे केंद्र-राज्य संबंध कमालीचे ताणलेले दिसतात. आरोग्य आणि गृह हे दोन्ही विषय राज्यसूचीतील असून त्याबाबतचा अधिकार राज्य सरकारचा असताना केंद्र सरकारने राज्य सरकारच्या अधिकारात एकप्रकारे हस्तक्षेप केल्याचे दिसून येते. केंद्र सरकारच्या लॉकडाऊनच्या निर्णयाला काही राज्य सरकारांनी विरोध दर्शविल्यामुळे त्यात अनेक बदल करण्यात आले होते. लॉकडाऊनचा निर्णय होण्यापूर्वी सर्वपक्षीय बैठक होणे, तसेच सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी बैठका घेणे ही बाब आदर्शवत ठरली असती. परंतु तसे काही घडले नाही. लॉनडाऊनचा दुसरा टप्पा घोषित करण्यापूर्वी मात्र सर्व पक्षीय बैठक, राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली खरी परंतू सर्व पक्षाचे व सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे म्हणणे ऐकल्यावर काही सूचना सांगितल्या तरी केंद्र सरकारने सूचनांचा विचार न करता स्वत:चेच निर्णय राज्य सरकारवर लादलेले दिसून येते. अशा विचारधारेमुळे केंद्र-राज्य संबंधाला धोका पोहचू शकतो की काय असा प्रश्न उपस्थित होतो.

केंद्र सरकारने काही राज्याच्या अनुभवातून शिकण्याची इच्छा प्रदर्शित करणे ही बाब केंद्र–राज्य संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल. साहजिकच एवढ्या मोठ्या संकटाचा सामना करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे व सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची मतमतांतरे बाजू ठेवत केंद्र सरकारद्वारे संयुक्त प्रयत्न होणे अत्यावश्यक ठरते. अशा परिस्थितीत विकेंद्रिकरण दृष्टीकोण ठेवणे राज्यातील जनतेच्या हिताचे ठरते. लॉकडाऊनच्या या कृतीतून एक व्यक्ती केंद्रीपणा, केंद्रिकरण आणि उच्चस्तरीय सुक्ष्म व्यवस्थापण हाच मार्ग स्वीकारल्याचे दिसून येते.

**२) कोरोना संकट – केंद्र सरकारचे राजकारण :**

केंद्र सरकारने राज्य सरकारांना देय असलेली वस्तु आणि सेवा करातील संबंधित राज्य सरकारच्या हिश्याची रक्कम राज्य सरकारला अदा न केल्यामुळे राज्य सरकार अधिकच अडचणीत सापडले आहे. केंद्र सरकारकडून अशी भूमिका घेण्यात आली की, ज्या राज्यात एन.डी.ए. आघाडीचे सरकार नाही त्या राज्यांना अल्प प्रमाणात आर्थिक तरतुद केली तर ज्या राज्यात एन.डी.ए. आघाडीचे सरकार आहे त्या राज्य सरकारांना मात्र भक्कमपणे आर्थिक तरतूद केली आहे. ही केंद्र सरकारची दुटप्पी निती समोर आल्याचे दिसून येते. संसदेतील खासदारांचा स्थानिक क्षेत्र निधी खासदारांना न देता संचित निधीकडे तो वळवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेतला नसता तर संसदेतील खासदार हे जिल्हा प्रशासन आणि नियोजन मंडळ यांच्याशी अधिकाधिक समन्वय साधून आपल्या मदतारसंघात याचा उपयोग करू शकले असत आणि कोरोनामुळे उद्भवलेली परिस्थिती हाताळण्यास राज्यसरकारला एक मदतच झाली असती.

उशीराने केलेली लॉकडाऊनची घोषणा आणि आरोग्य क्षेत्रासाठी १५ हजार कोटी रूपये याशिवाय काय होते. केंद्र सरकारने कोरोना विषाणू संसर्ग तपासणी चाचणी कीट बनवण्यासाठी अनेक औषधी कंपन्या केंद्र सरकारच्या परवानगीची वाट पाहत आहेत तेही आरोग्य संघटनेने निर्देष देऊनही केंद्र सरकार या बाबत उशीर करत असेल तर त्या पाठीमागे राजकारण आहे असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. भारतामध्ये ३१ जानेवारीला पहिला कोरोना रूग्ण सापडला. त्यावर विचार विनिमय करावा असे केंद्र सरकारला वाटले नाही किंवा त्याबाबत अधिक गांभीर्य दाखवले नाही. तर केंद्र सरदार दिल्लीत दंगल झाली की घडविण्यात आली? भारतात मात्र एका जमातीला टोमणे माण्याचा प्रयत्न करत होते. विद्याचौवर, शाहीनबागवर हल्ले सुरूच होते. यातच केंद्र सरकार व्यस्त असल्याचे दिसून आले. पश्चिम बंगाल मधील भाजपाच्या जनसंवाद रॅलीचे नियोजन करण्यात व्यस्त आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी जनतेशी संवाद साधायला हा पक्ष देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचतो मात्र ज्यावेळी शेकडो लोक आपल्या घरी परतण्यासाठी पाय चालत आहेत याकडे लक्ष देण्यास केंद्र सरकारकडे वेळ नाही. मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्मला एक वर्ष पूर्ण झाले याचे सेलिब्रेशन कसे करायचे या करीता केंद्र सरकार व्यस्त आहे. जनतेशी व्हर्चुअल रॅलीमधून संवाद साधण्यासाठी ठामपणे या कार्यक्रमाची आखणी केली. या सभा राजकीय नाहीत असे भाजपाकडून सांगितले जात असले तरी त्यातून प्रचार मात्र निवडणुकीचाच झाला. या रॅलीची सुरूवात बिहारपासून झाली कारण बिहार विधासभेच्या निवडणुका या वर्षअखेर आहेत.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कोरोनाचा देशातील लोकांना आणि अर्थव्यवस्थेला धोका असल्याचा इशारा दिला होता. या दरम्यान भाजपाचे नेते राहुल आणि सोनिया गांधींचे इटली कनेक्शन आणि इटलीतील कोरोनाचा प्रसार यावरून जाहीरपणे टिगल–टवाळी करत होते. तर काही नेते कनिष्का कपूरच्या पार्टीत जाऊन आले होते. मध्य प्रदेशावरचे संकट टाळण्यासाठी १६ तारखेचे अधिवेशन २६ तारखेपर्यंत पुढे नेले आणि त्यासाठी कोरोनाचे कारण दिले. त्या दिवशी पंतप्रधानानी दिल्लीत बैठक घेतली ती मध्यप्रदेशातील परिस्थितीशी संबंधित होती. पंतप्रधानांपुढे कोणता प्रश्न महत्त्वाचा होता यावरून केंद्र सरकारचे राजकारण लक्षात येते.

भाजपाच्या एका बड्या नेत्यांनी एका भर सभेत राहुल गांधींनी कोरोनाचा प्रभाव रोखण्यासाठी काहीही केलेले नाही असा आरोप केला. ही अशी विधाने करणे भाजपाचे विशिष्ट प्रचार तंत्र आहे. महाराष्ट्रात पहिला कोरोना रूग्ण पुण्यात सापडला होता. या विषयी भाजपाच्या नेत्यांकडून एक ट्विट करण्यात आले की, महाराष्ट्राला देवेंद्रजीची गरज आहे. अशा प्रकारचे विधान ही भाजपाचे विशिष्ट प्रचार तंत्रच आहे असे म्हणावे लागेल.

देशाची एकहाती सत्ता दुसऱ्यांदा सांभाळणारे देशातील निम्म्यापेक्षा अधिक राज्यामध्ये सत्ता असणारे जर आपण काय केले हे सांगण्याऐवजी विरोधी पक्षांनी काहीच केले नाही हे म्हणणे आपल्याला व आपल्या पक्षाला शोभणारे नाही. ज्या संकटाचा मुकाबला विरोधकांना सोबत व विश्वासात घेऊन करायचा तिथे निवडणुकीच्या आखाड्यातील भाषा येताना दिसून येते. राज्यसभा निवडणुकीच्या निमित्ताने जे राजकारण झाले तेही किळसवाणे आहे. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेची निवडणुक बिनविरेध झाली ते मात्र काँग्रेसच्या निर्णयामुळे झाली हेच चित्र राज्यसभेसाठी व्हायला पाहिजे होते परंतु तसे झाले नाही.

गुजरात व राजस्थानच्या आमदारांना रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले. एकीकडे कोरोना संकट व दुसरीकडे निवडणुका याकडे केंद्र सरकार व विरोधी पक्ष या निवडणुकीकडे बारकाईने लक्ष ठेऊन आहे. भाजपाकडून वाड्या-वस्त्यावर ७० हजार टी.व्ही. स्क्रीन लावण्यापर्यंत यंत्रणा राबवू शकते. पण या लॉकडाऊनच्या काळात मजूर पायपीट करत आहे हे दिसत नाही. लॉकडाऊनच्या काळात गायब असणारे मंत्री अचानक राजकीय सभा गाजवायला कसे काय उगवले हा प्रश्न पडतो. त्यामुळे या सरकारला नागरीक दिसतच नाहीत. त्यांना फक्त दिसतात ते म्हणजे मतदार अशीच म्हणण्याची वेळ आली आहे. कोरोनाचे संकट मानवजातीला काही चिंतन करायला भाग पाडेल. आपली जीवनशैली बदलायला भाग पडेल असेच वाटते.

**निष्कर्ष :**

१) कोरोना हे जागतिक संकट असताना केंद्र सरकार याकडे गांभीर्याने हाताळताना दिसून येत नाही.

२) संकटकाळात केंद्र आणि राज्य संबंधात राजकारण होत असल्याचे दिसून येते.

३) केंद्र सरकारकडून राज्य सरकारांना दुजाभावाची वागणूक मिळत आहे.

४) कोरोना संकटाचा सामना करताना केंद्र सरकारकडून व्यक्तीकेंद्रीत व केंद्रिकरण झाल्याचे दिसून येते.

५) कोरोना महामारीचा सामना करताना सत्ताधारी पक्ष व काही प्रमाणात विरोधी पक्ष राजकारण करताना दिसून येतात.

६) कोरोना संकटाचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून वेळ, पैसा आवश्यक प्रमाणात खर्च करावयास हवा तो करताना दिसून येत नाही.

७) कोरोना संकटाचा सामना करताना राज्य सरकारांच्या अधिकारावर मर्यादा केंद्र सरकारकडून लादण्याचा प्रयत्न होताना दिसतो.

८) सामान्य जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास केंद्र सरकारकडे कोणत्याही ठोस उपाययोजना असल्याचे दिसून येत नाही.

**समारोप :** कोरोना संकटाच्या बाबतीत राज्यकर्त्यांनी लोकांना घाबरायचे नाही तर सक्षमपणे तोंड कसे द्यायचे याविषयी विश्वास द्यावयास हवा. परंतु केंद्र सरकारमधील काही राजकीय नेते जनतेला घाबरवण्याचे काम करत आहेत. कोरोनाच्या संकटात हातावर पोट असलेल्या माणसांचे काय होणार, कोरोनापासून वाचतीलही पण भुकेच्या राक्षसापासून त्याचे आणि त्याच्या कुटुंबियाचे रक्षण कोण करेल या विषयी केंद्र सरकार मात्र कोणतेच ठोस पावले उचलताना दिसून येत नाही. मोफत आरोग्य सेवा आणि कल्याणकारी राज्यसंस्था ही मौल्यवान संसाधने आहेत आणि त्यांची अनिवार्यत या संकटकाळात उपयोगी येते याचाच प्रत्यय या कोरोना संकटकाळात उपयोग केंद्र सरकार व राज्यकारकडून अंमलात आणलेला दिसते. केंद्रातील विशिष्ट राजकीय पक्षाचे सरकार आणि राज्यातील भिन्न पक्षाचे सरकार यातील संबंध हे पर्याय सुडबुद्धीच्या आणि स्पर्धेच्या राजकारणाच्या पलीकडे जाऊन कोरोना महामारी संकटाचा सामना करण्यासाठी प्रयत्नशील रहावे. अर्थात विरोधी पक्षांनी एकतेची भावना अधोरेखित करीत पक्षीय टीका-टिप्पणी शक्यतो टाळावी. जरी सत्ताधारी पक्षाने दुर्लक्षित केले असले तरी त्याकडे कानाडोळा करून आपल्या माध्यमातून रचनात्मक योजना व त्याची अंमलबजावणी करावी. ऐक्यभावना निर्माण करणे ही सरकारचीच जबाबदारी ठरते. केंद्र सरकार आणि राज्य सरकारनी मिळून या कोरोना संकटकाळात विविध क्षेत्रात जी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली ती परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्नशील राहणे एवढेच अपेक्षित आहे.

**संदर्भ :**

१) नितीन ब्रह्मो – कोरोना आणि राजकारण

२) प्रशांत कदम – कोरोना संकटकाळात अमित शहाच्या राजकीय आरोळ्या.

३) सुगत बोस – भारतीय राष्ट्रवादाची ओळख – भारत आमची माता.

४) प्रशांत कदम – कोरोनाशी लढू पण या राजकीय व्हायरसचं काय?

५) राजरत्न कोसंबी – कोरोना भारतातील राजकीय व आर्थिक परिस्थिती.

६) डॉ. तृप्ती प्रभुणे – जागतिक साथीचा इतिहास.

७) www.who.in

८) श्रीकांत भोसले – भारत कोरोनावर मात करू शकतो.